


# झणझणीत अंजन

## एकांकिका

**कै.पांडूरंग सूर्यवंशी**

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# झणझणीत अंजन

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

a

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# झणझणीत अंजन

एकांकिका

कै. पांडुरंग सूर्यवंशी

# झणझणीत अंजन

**लेखक : कै. पांडुरंग सूर्यवंशी**
द्वारा- कुमुद्वती भोसले
प्लॉट नंबर 15, दिप सेवक सोसायटी, आर. के. नगर, कोल्हापूर.
संपर्क – व्हॉट्स ॲप क्र. ९९७०१०३३७८
Email : bhosalekumudwati@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकांच्या वारसाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(For free ebooks send your name and place)


प्रकाशन : १५ जुलै २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# कै. पांडुरंग देवाप्पा सूर्यवंशी

(जन्म -२३ जुलै.१९२६ मृत्यू -४ एप्रिल -१९७६.)



कवी व लेखक कै.पांडुरंग सूर्यवंशी यांचा जन्म-२३जुलै १९२६रोजी वडगांव, बेळगांव येथे झाला. कै. पांडुरंग सूर्यवंशी हे बेळगावचे सिद्धहस्त साहित्यिक आणि प्रतिभावान कवी होते.त्यांनी १९४८ते १९६५ या दरम्यान काही कविता,एक खंडकाव्य, लघुनिबंध व नाटक लिहिले. त्यापैकी कथा व कविता प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या पहिल्याच लघुकथेला पहिले बक्षिस मिळाले होते. त्यांच्या कविता अभिरुची आणि सत्यकथा या दर्जेदार मासिकातून अग्रक्रमाने प्रसिद्ध होत होत्या. 'तुला कोणती आणु वानगी', 'माऊली', 'अभिसार' या कविता 'अभिरुची'त गाजल्या होत्या. 'वैशाखाचे स्वप्न' हे खंडकाव्य शार्दुलविक्रीडित या वृत्तात लिहून त्यांनी 'अभिरुची' कडे प्रसिद्धिसाठी पाठविले होते. परंतु अभिरुची मासिक बंद पडले आणि ते खंडकाव्य अप्रकाशित राहिले.या खंडकाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे कै. माधव जुलियन यांच्या ' विरहतरंग' नंतरचे त्या वृत्तात लिहिलेले मराठीतील

ते दुसरे खंडकाव्य होते आणि त्या खंडकाव्याचा विषय हा अखंड आसामच्या डोंगराळ भागातील जनतेविषयी होता. रा. स्व. संघाचे ते निष्ठावंत कार्यकर्ते होते आणि संघाच्या नित्य कार्यामुळे त्यांच्याकडून विपूल साहित्य रचना झाली नाही. मात्र रा.स्व. संघाशी बालपणापासून संबंध आल्यामुळे त्यांच्या विचारात आणि शब्दात भावोत्कटता, लयबद्धता गतिमानता ओज व तेज हे गुण प्रकर्षाने जाणवत होते..

त्यांचे शिक्षण चिंतामणराव हायस्कूल, लिंगराज कॉलेज, लॉ कॉलेज आणि बी. टी. कॉलेज इथे होऊन त्यांनी 'एम. ए. एलएलबी. बी.एड. ' या पदव्या मिळवल्या होत्या. त्यानंतर चिंतामणराव हायस्कूल आणि नंतर सरदार्स हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. एक उत्तम व शिस्तप्रिय शिक्षक म्हणून त्यांनी नांव मिळविले होते.शिक्षक असतानाच वयाच्या ४० शीत ते दीर्घकाळ असाध्य व्याधीने आजारी पडले आणि किट्स, शेले, बालकवी यांच्याप्रमाणे साहित्यिक क्षेत्रात नाम कमावण्याची प्रतिभा असून सुद्धा सगळेच व्यर्थ गेले. साधारण साडेअकरा वर्षे ते अंथरुणाला खिळून होते.नंतर वयाच्या अवघ्या ५० व्या वर्षी म्हणजे ४एप्रिल १९७६ मध्ये ते वडगांव येथील आपल्या घरी निधन पावले.त्यामुळे त्यांचे सगळे साहित्य अप्रकाशित राहिले. कॉलेजमध्ये डॉक्टर ग्रामोपाध्ये,,

डॉ.वि.म.कुलकर्णीआणि कविमित्र शांताराम रामचंद्र यांच्या सहवासात राहून त्यांनी वाङमय प्रकाश मंडळातर्फे' नवधारा 'हा प्राथमिक काव्यसंग्रह आचार्य अत्रे व ग.त्र्यं माडखोलकर यांच्या उपस्थितीत बेळगांवच्या साहित्य संमेलनात प्रसिद्ध केला. या कविता संग्रहामध्ये देखील त्यांनी लिहिलेल्या चार ओळींची 'भाव कणिका' गाजली.

पांडुरंग सूर्यवंशी यांनी संत ज्ञानेश्वरांच्या जीवनावर आधारित लिहिलेले तीन अंकी नाटक 'माझा मराठाची बोलु' हे अप्रकाशित राहिले होते.ते 'वीरवाणी '१९९७ च्या दिवाळी अंकामध्ये प्रसिद्ध झालेले आहे."हे नाटक वैशिष्ट्यपूर्ण लिहिले आहे" असे प्रसिद्ध कादंबरीकार 'ना. सि.फडके' यांचा अभिप्राय असलेली टिपणी त्यांच्या हस्तलिखितावर आहे.

तसेच त्यांनी 'प्रक्षोभ' नावाचे १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यावर आधारित एक अभ्यासपूर्ण नाटक लिहिलेले आहे.ते दोन ऑगस्ट २०२२ रोजी www.esahity.com या वेबसाईटवर प्रकाशित झालेले आहे.

या व्यतिरिक्त 'चंद्रहास'हा त्यांचा काव्यसंग्रह ही आजारपणामुळे अप्रकाशित राहिला.यामध्ये त्याकाळी प्रसिद्ध झालेल्या काही

प्रकाशित कविता आहेत.व बाकीच्या अप्रकाशित कविता दोन्ही मिळून 'चंद्रहास 'काव्यसंग्रह प्रकाशित करत आहोत.वयाच्या २१/२२ व्या वर्षापासून त्यानी कविता केलेल्या दिसतात.

'हरपला पोलादी पुरुष ' ही कविता सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावर त्यांच्या मृत्यूनंतर लिहिलेली आहे ती १८डिसे. १९५०साली 'प्रेरणा' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली आहे.

'अंदमानातून' ही कविता सावरकरांवर त्याना अंदमानातील तुरुंगात शिक्षा दिल्याबद्दल लिहालेली आहे. ती २६ एप्रिल १९४६ रोजी ' संधि ' प्रातिनिधिक कविता संग्रहात प्रकाशित झाली आहे.

तसेच इतर काही कविता - 'कोष आता फोडिला हा,' 'प्रवासी', 'स्वप्नामागें ', 'संभवते तरि का-'.,'परि आज ', 'हिंदोळयावरची आस',. 'त्या सुंदरतेस्तव फिरतो-', ' असे आमुचा हाच संसार गे', 'उभय ध्रुवांच्या मध्यावरतीं ', 'मानवता ', 'हीच वांछा खुळी! ', 'या रंगभूमिवर ', 'काजवेच!...काजवेच!!', 'आरती ओवाळणे ही-,'

'मी हिन्दु......', ' माझा धर्म निराळा-', 'हा जीवनपथ', ''मन,श्रद्धा,बुद्धीपुन्हा निराश्रित झाली!', 'स्वप्नानी सखि निशा बहरली', तसेच 'भारताची भूपाळी ' या व अशा काही प्रकाशित कविता वेगवेगळ्या मासिकातून प्रसिद्ध झालेल्या आहेत.आता एकुण

१०० वर कविता 'चंद्रहास' या काव्यसंग्रहातून प्रसिद्ध व्हायच्या आहेत.त्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

तसेच वर उल्लेख केलेले 'वैशाखाचे स्वप्नं'हे खंडकाव्य शार्दुल-विक्रीडित या अक्षरगण वृत्तात लिहिलेले म्हणजेच चार ओळीचे एक कडवे व प्रत्येक ओळीत १९अक्षरे याप्रमाणे ३१६ कडवी असलेले हे खंडकाव्य'लवकरच प्रसिद्ध करण्याच्या प्रयत्नात आहे.

'कवचकुंडले' नावाची लघुकथा अप्रकाशित आहे. त्याचप्रमाणे एक ऐतिहासिक नाटक शिवाजी महाराजांवर लिहायला घेतले होते पण दुर्दैवाने ते अर्धवट राहिले आहे.त्याचप्रमाणै सोम्या आणि गोम्या नावाची विनोदी एकांकिका १६/८/१९५६ ला लिहिली आहे. ती www.esahity.com या वेबसाईटवर २० एप्रिल २०२३ रोजी प्रकाशित आहे. ते जर आजारी पडले नसते तर आता एक नावाजलेले लेखक, नाटककार,कवि व कथाकार म्हणून चिरपरिचित असते.इथे नशिबानी त्यांना साथ दिली नाही असेच म्हणावे लागेल.

संपर्कासाठी पत्ता-

सौ.कुमुद्वती राजेंद्र भोसले

कोल्हापूर.

फोन नंबर-९९७०१०३३७८.

**झणझणीत  अंजन -एकांकिका**

एकांकिका

**लेखक - कै.पांडुरंग दे.सूर्यवंशी**

---

**स्थळ -: बच्चू वाघमारे याची खोली**

**वेळ -: सकाळी सूर्योदय होण्याची**

**काळ -: सदा सर्वकाळ**

**--------------------+-**

**पात्रे प्रवेशानुसार**

**१) बच्चू वाघमारे**

**२) बिंदू वेडकुद्रे**

**३) मधू**

**४) अंजना**

**-----------------**

a

**((बच्चू वाघमारे याची खोली ही आधुनिकाच्या आणि सनातनी भटजीच्या खोलीची एक सरमिसळ आहे. बच्चू आपल्या नेहमीच्या व्यवसायात गुंतला आहे. त्याचा अलीकडचा व्यवसाय म्हणजे भल्या पहाटे उठून १०० घागरी पाणी डोक्यावर ओतून घेणे आणि मग पूजादि विधि उरकून घेणे. आज त्याने यापैकी १०० घागरी पाणी डोकीवर ओतून घेतले आहे.आता पूजेची सुरुवात होईल.......... हे असे का?....... सविस्तर हकीकत त्याच्याच शब्दात पुढे ओघाओघाने कळलेले बरे, नाही का?**

**समोर एक चौरंग. त्यावर देवतांची प्रतिष्ठापना. पूजा साहित्य - आजूबाजूस तेथील देवदेवता म्हणजे एक ताईत आणि एक अंगठी)**

बच्चू— (स्वतःशीच टॉवेलने डोके साफ करीत) लहानपणी बापानं बडवबडव बडवलं! पण त्याला सुद्धा धकलो नाही! कधीसुद्धा पूजाच काय पण नुसती संध्यासुद्धा केली नाही!! पण काळच सूड उगवितो म्हणतात ना! तशातली गत झाली आहे! गेले १०० दिवस ही पूजाअर्चा अगदी नेमान, निष्ठेनं करीत आहे मी! माझं मलासुद्धा या माझ्या निष्ठेचं आश्चर्य वाटतं! इतरांना माझी ही भक्ति सांगितली आणि त्यांना जर आश्चर्य वाटलं, तर विशेष नाही! पण आता लवकरच, अगदी आजच्या पूजेनंतरच माझी या कटकटीतून सुटका होणार आहे!! अहो,रोज १०० घागरी थंड पाणी आणि तेहि भल्या पहाटे

डोक्यावर ओतून घ्यायचे, म्हणजे काय चेष्टा आहे? पण करता काय? केलं पाहिजे! तपश्चर्या आहे ही! प्रेमाची तपश्चर्या! पण फलप्राप्ति काही होते की शेवटी एवढ्या घागरी ओतून घेऊनहि मी कोरडाच राहतो, दैव जाणे!! काय होईल ते होवो!आजचा आपला गीतेन सांगितलेला मार्ग! "कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन!" पंचा नेसून झाला आहेच! भगवन्त म्हणतात, अजून जानवे खुंटीवरच राहिले आहे की! चला आता पूजेला सुरुवात. (पाटावर बसू पाहतो परंतु दारावर टिकटिक ऐकून अर्धवटच उभा राहतो) एवढ्या सकाळीच कोण सूर्यवंशी उपटला इथे? अजून सूर्योदयसुद्धा झालेला नाही! (दरवाजाकडे पाहून मोठ्याने) कोण हो? कोण आहे? (उत्तर नाही पण मोठ्याने टकटक चालूच!) अहो,माझं दार म्हणजे काय ढोलके समजला काय? हा ढोल नव्हे,माझं दार आहे हे! (जोरात टकटक चालू) अरे कोण अडमडलाय तिथं? मी पूजेला बसलो आहे!

(अखेर त्रासिक मुद्रेने दार उघडतो. कु. बिंदू वेडकुद्रे प्रवेश करते. तिला पाहून आश्चर्याने)

कोण, तू?आणि यावेळी कशाला आलीस इथं?

बिंदू ----: आज सूर्य बुडण्यापूर्वी मरायचंच असा निश्चय करून घराबाहेर पडले आहे मी.

बच्चू ----: काय म्हणालीस?

बिंदू ----: आज सूर्य बुडण्यापूर्वी मरायचंच असा निश्चय करून घराबाहेर पडले आहे मी.

बच्चू ----:(आनंदातिषयाने) अहाहा! किती शुभ वर्तमान आहे हे! आता तिसऱ्यांदा तेच शब्द उच्चारून त्याला त्रिवार सत्याचं स्वरूप दे! (उत्सुकतेने) खरंच मरणार तू? माझ्या मागची पिडा निकालात निघणार? खरंच?

बिंदू ----: अगदी खरं!

बच्चू----: माझ्या तपश्चर्येच्या फलप्राप्तीची प्रसादचिन्हं दिसू लागली तर! बिंदू, तू केव्हा पासून इतकी उदार झालीस?

बिंदू ----: आज सकाळी उठल्याबरोबर पहिला विचार जो मनात आला तो हा होता!

बच्चू. ----: अहाहा! परमेश्वर फार दयाळू असला पाहिजे! (.... गुणगुणत....)आज ये मंगल दारि प्रभात!

a

बिंदू----:पण मी शेवटचं अगदी अखेरच विचारते. खरंच का मला तुमच्या हृदयात अस्तित्व नाही?

बच्चू ----: बिंदू,कसं सांगू तुला! ती जॉमेट्री घसा खरवडून सांगते की बिंदूला अस्तित्वच नसतं! तुझं स्थान माझ्याजवळ कसं बरं असू शकेल?

बिंदू ----:आणि मी मरणार म्हणून आपल्याला खरंच का हो आनंद झाला ?

बच्चू ----:माझ्या मागचं तुझं शुक्लकास्ट संपणार म्हणून मला का बरं आनंद होऊ नये? आज मला काव्य स्फुरण्याइतका आनंद झालेला आहे! अरे हो! मला मगाशी नवी काव्यपंक्ति स्फुरली हे माझ्या लक्षातच आलं नाही! (गुणगुणतो) "आज ये मंगल दारि प्रभात!" पाहिलंस! मला किती आनंद झाला आहे तो! मला इतका आनंद झाला आहे, इतका आनंद झाला आहे की,काय करतो आहे मी हेच मला कळेनासं झालं आहे! का? तुला वाईट वाटलं हे ऐकून?

बिंदू ----: छे! मुळीच नाही! आपल्याला आनंद झाला हीच माझ्या समाधानाची गोष्ट! माझ्यासाठी आपण रडावं अशी माझी मुळीच अपेक्षा नव्हती,नाही! आपल्या रडण्याचं दान हाती पडण्याची आशा असती तर मी मरण्याचा निश्चयच करते ना! जन्मोजन्मी हाच पती दे असा मी देवाजवळ हट्ट करून बसले असते!

बच्चू ----:(आवंढा गिळून) अस्सं? बरं झालं! खोटं खोटं रडण्याचा मोह मी अगदी कष्टाने आवरला! नाहीतर तुझी घोरपड जन्मोजन्मी गळयात बांधून घेण्याची घोर शिक्षा भोगावी लागली असती! थांब, माझ्या आनंदाची सबंध कविताच मी तुला करून दाखवतो कसा! म्हणजे चौऱ्यांशी लक्ष योनीच्या फेऱ्यात गटांगळया खाताना तुझी चुकून सुद्धा गाठ पडणार नाही!

(कविता करण्याची "पोज" घेतो. काही काळ तालात चिंतन. स्तब्धता)

बिंदू ----: खरोखरच मी आज धन्य झाले!

बच्चू----:. (चमकून) काय म्हणालीस ! आॅ?

बिंदू ----:(गुणगुणत) 'आज मम भाग्य उदित जाहलें!'

बच्चू ---: काय तूच माझ्या अगोदर काव्य करू लागलीस?

बिंदू ----: हो.

बच्चू----:. का? तू मरणार म्हणून?

बिंदू. —-: :छे!

बच्चू----: (केविलवाण्या स्वरात) म्हणजे तू मरणार नाहीस आज?

बिंदू ----: मरणार तर!

बच्चू ----:मग आणखी काय भानगड आहे?

बिंदू ----: माझ्या मरणानं मी तुम्हाला परमानंदित करणार म्हणून! ज्यांच्यावर जीवापलिकडे प्रेम केलं त्या तुम्हाला आनंदित करण्याचं भाग्य मला लाभणार, हे काय थोडं आहे?

बच्चू ----:(संशयग्रस्ततेने) अस्सं? आता माझ्या लक्षात येऊ लागलं बरं का! तू हा काहीतरी डाव रचते आहेस! मला फसवण्याचा तुझा डाव असला पाहिजे! मरताना इतकं कुणी आनंदी असू शकेल? छे! काहीतरी कुटील कारस्थान यशस्वी होत चालल्याबद्दलचा हा तुझा आनंद असला पाहिजे! मी तुझ्या त्या कुटील जाळ्यात अडकला जात आहे,होय ना? खरं की नाही?

बिंदू ----: नाही.अगदी मरणाशप्पथ नाही हो!

बच्चू ----:ठाऊक आहे! बायकांच्या शपथा ह्या! त्यात वर मरणाची शपथ! मेल्यावर कोण तुला पकडायला येणार आहे?

बिंदू----: जळळं मेलं! मरणानंतर मला कुणी पकडो अगर न पकडो! ते कुठे मला पाहायला हवं आहे! इथं तर जिवंतपणी कुणी माझा हात देखील पकडीत नाही! पण मी तुम्हाला पुन्हा शपथेवर सांगते : मी मुळीच खोटं बोलले नाही!

बच्चू ----:(एकदम स्वतःला सावरीत) अरे बापरे! आता आलं लक्षात. थांब आता तुझी उलट तपासणीच करतो! साक्षीच्या पिंजऱ्यात उभी असल्याप्रमाणं उभी राहा पाहू! मी सांगतो तसं म्हण — ' देवाची शपथ घेऊन खरं बोलतो ' म्हण!

बिंदू ----:इश्य! मी ' बोलतो ' असं कसं म्हणू? तुमचं वाक्य दुरुस्त करा गडे!

बच्चू ----:हॅट! मी 'बोलते '— असं कसं म्हणावं? ते काही नाही! मी सांगतो तसं मुकाट्यानं म्हण!

बिंदू ----:त्यापेक्षा तुम्ही एखादी स्त्रीच वकील नेमा ना! ती माझी करील उलट तपासणी!

बच्चू ----:म्हणजे आटोपलंच! स्त्रीला स्त्री वश! आणि शपथ शब्दाचे लिंग कुठलं ग?

बिंदू ----: स्त्रीलिंग!

बच्चू----: बरोबर! आणि इथेच तर सारं बिंग आहे! तू स्त्री,वकील स्त्री आणि शपथ ही सुद्धा स्त्रीच! या तीन स्त्रियांच्या तावडीत सापडण्याला मी जाणून बुजून संमती दिली तर माझे 'तीन तेरा नऊ अठरा 'झालेच म्हणून समज! या शपथेची लुडबुड नको इथं! बोल, नुसतंच बोल! प्रश्न पहिला: तू मरण्यासाठी जागा कुठं मुक्रर केली आहेस?

बिंदू ----:(एकदम आठवल्या सारखे करून लाडिकपणे) इश्य गडे! एक विनंती करायची राहून गेली!

बच्चू----: (डाव ओळखण्याचा पूर्ण आव) गडे का? वा! अगदी एखाद्या प्रेयसीप्रमाणे लगट! काही हरकत नाही! तुझी विनंती तरी ऐकू दे!

बिंदू -----(त्याच लाडिकतेनं) असं हो काय? मी आणखी थोड्या अवधीनंतर मरणार आहे!

बच्चू — भगवंता, हिचा हा निर्णय कायम टिको!

बिंदू ---- मरणाऱ्या माणसाची शेवटची इच्छा विचारतात.

बच्चू----- आणि ती पुरवितातहि! असंच ना? पण याला अपवाद एकच! तुझी शेवटची इच्छा तुझ्याशी लग्न करण्याची नसावी!

बिंदू---- ' शेवटच्या इच्छेला ' कुणी 'नाही ' म्हणत नाही!

बच्चू---- अगदी खरं! पण मघा सांगितलेला तेवढाच अपवाद! अपवादानंच नियम सिद्ध होत असतो म्हणे!

बिंदू ---- तर मग माझी इच्छा ऐका : मला फक्त या पायाशी मरू द्या!

बच्चू----.(एकदम मागे उडी मारून) इथं? या खोलीत?

बिंदू---- (याचनेच्या स्वरात) कराल ना ही इच्छा पुरी?

बच्चू ----(आश्चर्यभीतीच्या पूर्वीच्याच आवाजात)
माझ्या पायाशी?

बिंदू----(लाडिकपणे) असं काय ते?

बच्चू-----(तिच्या लाडिकपणाकडे पाहून) अरे वा! मार डाला!! अक्षरश: मार डाला!! (एकदम रागाने) चांडाळणी, कोणता कट रचून आली आहेस इथं? तुझ्या उलट तपासणीतून याच कटाचा शोध लावणार होतो. त्याविनाच हा धागा अनायासे आणि वेळीच हाती आला तर!

बिंदू----- असं हो काय? मी कसला कट करणार? कटाची कटकट या आनंदाच्या वेळी कशाला?

बच्चू----. यावेळी जर केली नाही तर माझ्या कपाळी कायमची कटकट लागेल, त्याचं काय? माझी वेळ भरली तर त्याचं सोयरसुतक तुला काय? त्यात तू मरायला निघालेली!

बिंदू ---- इश्य! हे काय अभद्र बोलणं!!

बच्चू---- वा! चोराच्या उलट्या म्हणतात त्या ह्या! अभद्र बोलणं नव्हे, अभद्र करणं म्हण! तू अगदी माझं वाटोळं करायला यावेळी इथे आली आहेस! तू इथं माझ्या पायाशी मरणार! आणि पोलीस खात्याची आग माझ्या पाठीशी लावणार! तुझ्या मगरमिठीतून मला पळता येऊ नये आणि पोलिसांच्या पलीत्यातून मी वाचू नये! छान! छान शक्कल आहे ही!'आधीच मर्कट तशातहि मध्य प्याला ' अशातल

आमचं पोलीस खातं! आणि त्यांच्या हाती या तुझ्या आत्महत्येचं, माझ्या पायाशी पेटून पडणार धगधगत कोलीत! म्हणजे आटोपलंच आमचं! तुझ्या मागोमाग माझी रवानगी,वर, स्वर्गात!! चांडाळणी, हाच ना तुझा डाव?

बिंदू ---- माझी शेवटची इच्छाहि तुम्ही पुरी करणार नाही तर! हाय रे दुर्दैवा! (हुंदके देते)

बच्चू ---(किंचित अनुकंपेने) तुझी शेवटची इच्छा हे बोलणं ठीक! पण आमचा तिथे शेवट होणार त्याचं काय?

बिंदू—--. (हताशपणे) बरं S तर!असू दे! मरेन मी बिचारी कुठंतरी! पण जाता जाता माझ्या मरणाच्या बातमीपेक्षाहि अधिक आनंददायी बातमी मी तुम्हाला सांगून जाते.

बच्चू ---- तुझ्या मरणाच्या बातमीहून अधिक आनंददायी बातमी दुसरी कोणती असू शकणार नाही! तू आपली मरायलाच अगोदर जा कशी! निष्कारण तुझ्या मरणाचा वेळ लांबायचा!

बिंदू — बरं S बाई! जाते आपली मी! पण ती बातमी (दरवाजा गाठीत) अंजना गोळीकेरी बद्दल—--

बच्चू ----(एकदम तिला धावत जाऊन आडवीत) ए! ए मग थांब! सांग!तिची काय बातमी आहे ती अगोदर सांग!

बिंदू ---- अहं!आता नाही मी सांगणार! मला मरायला वेळ होतोय!

बच्चू — तू चिरंजीव राहिलीस तरी हरकत नाही!पण तिची बातमी काय, ते अगोदर सांग! हे बघ तिच्यासाठीच तर ही पूजा बांधून बसलोय मी!

बिंदू ----(मागे वळून आश्चर्याने). पूजा?

बच्चू----. हो, हो! ही काय, इथं!

बिंदू —- कुणाची?

बच्चू ---- हा बघ ताईत! याचं नाव 'चिंतामणिताईत' हा ज्योतिषिमार्तंड दिवाकर दिवटेशास्त्रींकडून मी मागविला आहे.हा चिंतिलेलं देतो. पण केव्हा? याला रोज अभिषेक करायला हवा. एक दोन दिवस नव्हे! एकशेहेएक दिवस; आणि तेही शंभर घागरी पाणी भल्या पहाटे भडाभडा डोकीवर ओतून शुचिर्भूत होऊन! माझ्या पूजेचा हा

a

१०१वा दिवस आहे!आता अंजना गोळीकेरी आपल्या पायाने चालत येईल!.

बिंदू— (अधिक चौकसपणा दाखवून) अय्या! खर्रच? आणि ही तांब्याची दुसरी गोल वस्तू काय आहे?

बच्चू ----(नापसंतीदर्शक) वस्तू?अगं देवता म्हण, देवता! ही एक अंगठी आहे! हा ताईत देव,आणि ही अंगठी देवता! माझे साक्षात पार्वतीपरमेश्वरौ! देवोदेवी नमो नमः! (नमस्कार करतो) ही अंगठीसुद्धा तिच्याच म्हणजे अंजनाच्याच प्राप्तीसाठी!

बिंदू — अस्सं का?

बच्चू —. हो

बिंदू---- ही कुठून मागवलीत?

बच्चू ---- तुला अलीगढ ठाऊक असेलच!

बिंदू ---- कुणी तानाजीनं सर केला होता का तो गड?

बच्चू ---- नुसती 'ढ' आहेस झालं! अलिगढ हे उत्तर हिंदुस्थानातील एक अलीकडचं वाळवंट आहे!

बिंदू---- मग त्या वाळवंटात तो किल्ला असेल! राणा प्रतापाची तिथं राजधानी होती ना!

बच्चू — जाऊ दे! माझा इतिहास कच्चा आहे! मी फक्त भूगोल चांगला जाणतो!

बिंदू —- अय्या! माझा भूगोल अति कच्चा हो! इतिहासात मात्र माझी गति गरुडाची!ऐतिहासिक व्यक्ति होणं मला स्वतःला फार आवडतं!

बच्चू-----. तू आता गरुडभरारीनच इतिहास जमा होणार आहेस! काही काळजी करू नकोस!

बिंदू ---- अय्या! बरं झालं आठवण केलीत ते! मला मरायला वेळ होतोय नाही? मी आपली निघते हो!

बच्चू---- नको.एवढ्यात नको. तुझ्या पाया पडतो!—- तशी जाच तू! पण तेवढं अंजनाबद्दलची वार्ता मला ऐकवून!

a

बिंदू ---- ऐकवीन,पण तुमच्या त्या गोल गोल तांबड्या वस्तूचा -नव्हे ; देवतेचा भूगोल तुम्ही पुरा केल्यावर!

बच्चू—-. हात् तिच्या! घडाघडा पाठ म्हणून दाखवितो. त्यात काय एवढं? त्या अलीगढातील हे एका विश्वविख्यात जंतरमंतर कंपनीकडून मिळवलेले 'वशीकरण यंत्र 'आहे! हे १०१ दिवस जवळ बाळगलं की तुमच्या प्रेमाची व्यक्ति आपण होऊन तुमच्या मागे लागते! पण हिलासुद्धा जो स्पर्श करावयाचा तो १०० घागरी डोकीवर पालथ्या घातल्यानंतरच!

बिंदू ---- अय्या! यालाही १०० घागरी पालथ्याच केल्या पाहिजेत काय? एवढं करून पालथ्या घागरीवर पाणी नाही ना व्हायचं?

बच्चू----- हॅट्! काय बिषाद आहे!

बिंदू ----तरीच ग बाई! अंजनेन कालच मधु भातकांड्याला उडवून लावलं आणि आज ती आपल्याकडे येणार आहे!

बच्चू---- कशाला? उडवून लावायला तर नाही?

बिंदू ----- तुम्हाला उडवून लावणं तिचं नेहमीचच आहे हो!– नव्हे होतं! आता तुमच्या या प्रखर तपश्चर्येनं मनू पालटला! ती आता आपली होण्यासाठी येणार आहे. एव्हाना यायला निघालीसुद्धा असेल! आहात कुठे?

बच्चू — हा काय, इथंच आहे मी! हीच बातमी सांगणार होतीस ना तू!

बिंदू ---- हो. हीच.आणि एवढीच!

बच्चू — वा! जीते रहो 'चिंतामणि ताईत';'वशीकरण यंत्र' झिंदाबाद!बोला, 'बिंदू' की जय! बिंदू झिंदाबाद! बिंदू अमर रहे! तू आता लवकर मरायला जा! त्वरा कर!

बिंदू — (त्याच्याच आवेशात) जीते रहो चिंतामणि ताईत! वशीकरण यंत्र झिंदाबाद! इतक्या लवकर मरणापासून परावृत्त करणारा मार्ग मला मिळेल हे माझ्या स्वप्नीहि नव्हतं! मी आता जिवंत राहणार!

बच्चू---- (आश्चर्याने) आॅ! तुला काय मिळालं?

a

बिंदू ----- जगण्याचा मार्ग.आता मी चिंतामणि ताईत आणि वशीकरण यंत्र मागविते! तपश्चर्या करते. मग तुम्ही यालच की माझ्या घरी चालत! (हसत) अच्छा! बाय् बाय् टा ऽ टा ऽऽ!! (जाते)

बच्चू---- टाटा, चांगला 'बाटा' पडला टाळक्यात, इथ!

अरेरे!,घात झाला घात झाला! (दुःखाने) संजीवनी मंत्राच हरण करुन जसा कच गेला तशी ही निघून गेली!

'पूर्णोत्स्थापन काल तोच पतनप्रारंभहि जाहला!' 'अत्युच्ची' पदि थोरहि घसरतो हा बोल माझा खरा! घात, घात झाला!

(कुडबुड्या ज्योतिषी प्रवेश करतो)

कुडबुड्या------(कुडबुडे वाजवून) घात झाला? कशाचा घात झाला रावशाब? मी ज्योतिष सांगनार जिंदा हाय!घात कशा व्हईल? (कुडबुडे वाजवतो) या आजच्या रामाच्या पारी तुमच्या मनानं इवजल्यालं इस्पष्ट करीन. तुमचं भविष्य सांगेल.धनवंत हुनार तुमी मायबाप!(कुडबुडे वाजवितो)

बच्चू----- कोण ज्योतिषि का? ये बाबा! अगदी वेळेवर आलास! तू ज्योतिषि आहेस एवढं पुरे झालं! मग तू काही का सांगेनास! बुडत्याला काडीचा आधार! ये माझ्या आधारा, माझ्या नशिबी काय आहे ते

एकदा सांगून टाक! आजपर्यंत अनेक देवदेवरशी झाले,अनेक सोंगढोंगं पाहिली.अनेक ज्योतिषिमार्तंड झाले.

राहता राहिला होतास तो तूच कुडबुड्या ज्योतिषि!तुझ्या त्या कुडबुड्यांनं माझ्या भविष्याचा बुडबुडा एकदाचा फोडून दाखव मला!

कुडबुड्या------ जय मल्हार,

माळसाकांत!

(कुडबुडे) या धनी अशे संबुर या!मी तुम्हानला ठीक दावतो. हा कुडबुड्या ज्योतिषि हाय! निस्ता बडबड्या नव्हं! (बच्चू हात पुढे करतो त्याच्या हाताकडे व डोळ्याकडे आळीपाळीने पाहतो.कुडबुडे वाजवीत) तुमच्या मनकामना पुरण व्हणार मालक! मोठं औक्षवंत हैसा. पिंगळा बोलतो ते ख्वाटं न्हाई व्हायचं! रात्रीच्या प्रहरामधीं सूर्याच्या जटा जाळून,वाळवेचं त्याल काढीत पिंगळा बोलतो! काय कळलं?

(कुडबुडे) तुमच्या जीवाला रात्रंदीस ध्यास हाय! लई घोर पडलाय तुम्हास्नी; पन रावश्याबांनी चिंता कराया नग! आता लई येळ डोळं लावून बसाया नगं!

(कुडबुडे) आता इस्पष्टच सांगतो.आजच्या दिवशी त्या कोपऱ्यातल्या बाजूनं याचं दरवाजातनं या घरची लक्ष्मी आपल्या पायानं चालत येनार हाय! बोलावं सरकार! आनी काय होवं?

a

(कुडबुडे वाजवितो)

बच्चू-----(आनंदाने) तू म्हणतोस ते खरं ठरलं तर तुला सोन्याने मढवलेलं कुडबुडं देईन. खोटं ठरलं तर तुझं मढ पाडीन!

कुडबुड्या-----अक्षी तैयार हाय धनी! तुमची ताईताची आन् अंगठीची पूजा फुकाट न्हाई जायची!

बच्चू---- न्हाई ना! मग आता जा तू! संध्याकाळी ये. तुझ्या भविष्याचा पडताळा आल्यावर तुझी बक्षिसी.

कुडबुड्या----- बक्षिसी सावकाशीनं-- वर्साभरानं दिली तरीबी चालंल! न्हाई दिली तरी वांदा न्हाई; पण आत्ताच्या घटकंला च्या- बिडीसाठी एक चवली द्या! तुम्हास्नी भविष्य सांगून उब आनली, आता वाईच मी गरम होईन!

बच्चू---छट्, आता काहीच नाही! नया पैसा सुद्धा नाही! तू मला फसविलं नसशील कशावरून?

कुडबुड्या---- फसगत?

(कुडबुडे)कुनाची? तुमची?

a

जीभ झडंल फसवनाऱ्याची!

(कुडबुडे)

बच्चू---पण आता कवडीसुद्धा नाही मिळणार!

कुडबुड्या-----(अजीजीने) हे काय बोलणं झालं मायबाप! दानाबिगार गिरान कसं सुटंल सरकार? दे दान सुटे गिरान! (कुडबुडे)

बच्चू ----(खिसे चाचपडून) घे. चल उठ. हा एक आणा व हा एक पैसा आहे. एवढा घे. हे जुने आहेत हे लक्षात ठेव! याचे आठ नये पैसे तुला मिळतील!

(कुडबुड्या उठतो. नमस्कार करून जाण्याची तयारी करू लागतो. जाताना कुडबुडे वाजवितो)

बच्चू ----आज नक्कीच येणार ती! पण हो!आणखी एक राहीलच!अरे ए कुडबुड्या,-

कुडबुड्या -----(मागे फिरून) जी धनी काय आज्ञा हाये?

a

बच्चू------ तू भविष्य बोललास खरा. पण अजून एक विघ्न निर्माण होईल असं दिसतं, त्याचं काय?

कुडबुडेबुवा -----हा! वळकलं जी! मी वळकलं न्हवं!!पन तेची काई बाधा न्हाई म्हनूनशान बोललो न्हाई!

बच्चू ----म्हणजे तू इथं आता काही वेळेपूर्वी झालेला प्रकार ओळखलास? तिनं माझ्याकडून माझा महामंत्र चोरून नेला हे हि जाणलंस?

कुडबुड्या----- न्हाई वळकलं तर पिंगळा कशला? अक्षी सार ताडलं!

बच्चू ----मग त्या मंत्राचा प्रभाव माझ्यावर पडेल त्याचं काय?

कुडबुड्या---- पडला तर पडला!त्याचं काय इतकं?

बच्चू ----वा! भले! अरे आज येणारी माझी लक्ष्मी आणि आणखी शंभर एक दिवसांनी ती गळ्यात पडणारी घोरपड! अरे दोन बायका बाळगायच्च्या कशा?एका म्यानात दोन तलवारी, असं कुठे झालंय?

a

कुडबुड्या------ अहो,वाईच दमा, वाईच दमा.मी काय सांगतो ते पुरतं ऐकून घ्या!अहो तुमच्या दिमतीला मुंबई सरकारचा कायदा हाय!दोन बायका व्हतील कशा?आॅ ?

बच्चू ----अरेच्चा खरंच की! धन्य आहे तुझी कुडबुडे बुवा!

कुडबुड्या---- माझी कसली धन्! मुंबई सरकारची म्हना!. (कुडबुडे) बरं,आता येऊ?

बच्चू ---- शाब्बास! ही घे आख्खी चवली!

(कुडबुड्या चवली घेऊन कुडबुडे वाजवीत निघून जातो.)

बच्चू----. बस्स! आज मी धन्य होणार! मुंबईसरकारचाहि माझ्या प्रकरणात संबंध पोचला तर! धन्य धन्य!या यंत्र ताईताबरोबर आज या सरकारचीहि पूजा केली पाहिजे! (वशीकरण मंत्र व चिंतामणिताईत यांना मनोभावाने वंदन करतो)

बस्स, आता अंजनेच्या स्वागताची तयारी केली पाहिजे. चला, उठा, हे गोपीचंदन, भस्म, धूप, दीप, चंदनादि लोकहो, उठा! पडा

a

आपापल्या डब्यात. अरे हो, पण आजची पूजा राहिलीच आहे नाही अजून? चला अगोदर पूजा!

(ताईत, वशीकरणयंत्र यांना मनोभावे अभिषेक करतो, गंध, अक्षता, फुले वाहतो. स्वतः गंध लावतो. धूपदीप आणि साखरेचा नैवेद्य दावतो. नमस्कार करतो.आणि मग सर्व सामानाची लगोलग आवरावर करून ठेवून देतो.गळयात ताईत बांधतो. अंगठी हातात घालतो.)

आज एकशे एक दिवस अभिषेक केलेली ही अंगठी व हा ताईत मी अंगावर धारण केल्यावर अंजना घरातून बाहेर पडली असलीच पाहिजे.अहो,'स्नो पावडर फणी अँड को.' आता असे सामोरे या! हा आरसा! उभे रहा समोर! अरे, हा गंध,हे भस्माचे पट्टे इथं अजून आहेतच की! आणि या अवतारावरच मी स्नो-पावडर चोपडायला सिद्ध झालो आहे! हा सारा धांदलीचा परिणाम! 101 दिवस झाल्यानंतर अंजना येईलच याची खात्री होती. तथापि अगदी एकशे एकाव्या दिवशी आणि तीही माझी पूजा संपते न संपते तोच येईल अशी काही कल्पना नव्हती माझी! पण काय प्रभाव आहे पहा त्या देवदेवतेचा! अगदी पार्वती परमेश्वरांवरहि ताण! तात्काळ गुण! १०१ वा दिवस उजाडतो न उजाडतो एवढ्यात ती येत असल्याची,अगदी तडक येत असल्याची शुभवार्ता!आजचा दिवस चांगला की वाईट हे न समजण्याइतक्या सर्व घटना कशा अगदी झटपट घडत आहेत! हे वशीकरण यंत्रा, हे चिंतामणिताईता, तुम्हीच

a

हो मायबाप माझे! यातून मला मार्ग दाखवा! मी हा असा अगदी भटजीच्या वेशात, अजागळासारखा इथे होतो! आणि एवढ्यात अंजना आली तर! तिचं स्वागत काय अशा वेशात करायचं? हे ध्यान पाहून तिला काय वाटेल? मजकडे वळलेलं तिचं प्रेम माझ्यावरच कसं टिकून राहील? ती काय या नामाच्या रेघेवर, या भस्माच्या पट्ट्यावर आणि या गंधाच्या मुद्रांवर प्रेम करण्यासाठी येत आहे? हा अवतार उतरविण आता अगदी आवश्यक आहे! तेव्हा हे तपश्चर्ये, या बच्चमजी वाघमारेचे या गंधाच्या मुद्रांसकट, या भस्माच्या पट्ट्यासकट,या नामाच्या रेघासकट, अगदी या नेसूच्या पंचासकट,या जानव्यासकट तुला शेवटचे दीर्घ दीर्घ कोपऱ्यापासून शत–शत, कोटि कोटि प्रणाम! (कोपऱ्यात जाऊन तोंड स्वच्छ धुऊन येतो. शर्ट पॅन्ट चढवितो.पावडर लावतो.केस ठाकठीक करतो. एवढ्यात दरवाजात अंजना आणि मधु याचे यांचे शब्द ऐकू येऊ लागतात.मधु भातकांडे अजिजीच्या स्वरात आणि अंजना गोळीकेरी चिडलेल्या स्वरात बोलत आहे)

अंजना---- (पडद्यात अगोदर खालच्या स्वरात. किंचित अंतरावरून शब्द येत असल्याप्रमाणे) कितीदा सांगितलं तुला मी! चालता हो माझ्यासमोरून! माझ्या दृष्टिसमोर सुद्धा उभा राहू नकोस तू!

a

मधु ----(पडद्यात) नको ग!अंजना, माझ्या हृदयाचा एवढा अंत पाहू नकोस! असं तडकाफडकी आपले संबंध तोडून तू मला जन्मभर तडफडत ठेवू नकोस!

अंजना----(दार वेगाने ढकलून प्रवेश करते)-- चालता हो! चालता हो म्हणते ना! मी आता या घरात शिरले आहे! इथं कायम वास्तव्य करण्याच्या निश्चयानंच मी हे पाऊल तुझ्या समक्ष आत टाकलं आहे.आता तरी तुझी खात्री पटली? जा.आता माझ्या पुढून. कायमचा चालता हो! आता माझा अंत पाहू नकोस!

मधु—-- मी तुझा काय अंत पाहणार! आता या दारात तू माझा अंतच पाहा म्हणजे झालं! मी या उंबऱ्यावर नाही तर त्या समोरच्या दगडावर माझं डोकं आपटून प्राण सोडणार आहे! माझाहि हा निश्चय कायम आहे

अंजना—-- (आवासून पहात असलेल्या बच्चूस. तो टाय बांधायची, प्रसाधनाची क्रिया अर्धवट ठेवून तसाच आश्चर्यस्तब्ध आहे.)
बच्चंजी!

बच्चू—-- (एकदम भानावर येऊन). ओ. काय बाई?

a

अंजना —-- बाई काय? आणि अशी राख पासून काय उभे आहात? आणि गळफास लावून घेण्याच्या विचारात होता की काय? आता मी तुमची व्हायला आले आहे!

बच्चू —--. मग आता हरकत कुठे आहे?

अंजना—-- हा,हा चांडाळ आहे ना इथं! हाकलून द्या याला गच्चांडी मारुन. मला याची चीड आली आहे, तिटकारा, घृणा वाटते याची! याला इथं थांबू देता कामा नये!

बच्चू---- हो,हो,याला इथं थांबू देता कामा नये!

अंजना ----. द्या,द्या हाकलून त्याला! टाका तो गळफास त्याच्याकडे. मरू दे त्याला तो लावून घेऊन!

बच्चू — अहो पण मी हा टाय बांधतो आहे! माझा पोषाख चाललाय हो. हा स्नो पावडर आहे ही! राख नव्हे!. तुम्ही जरा थांबाल का? हे एवढे सारखं करतो आणि मग देतो हाकलून त्याला!

अंजना— आग लावा तुमच्या त्या स्नो-पावडर -टायला! इथं माझ्या सर्वांगाची लाहिलाहि होते आहे तर तुम्हाला स्नोपावडरटाय सुचतो आहे!

बच्चू-----. नाही हो हे सार तुमच्या स्वागतासाठीच चाललंय!

अंजना-----. माझ्या?

बच्चू---- हो!मी असा बैराग्यासारखा गळयात फडक्याप्रमाणे टाय लोंबता ठेवून तुमच्यासमोर आलेलं चालेल? आवडेल तुम्हाला हा फासलेला चेहरा?

अंजना----. चेहरा पाहून यायचं असतं तर इथं माझं कधीच येणं झालं नसतं! ठेवा तो स्नो, ती पावडर आणि तो टाय!

बच्चू —- (लगबगीने आज्ञा पाळीत) हो!

अंजना—-- छान,मला तुमच्यासारखा जोडीदार हवा आहे! आधुनिक स्त्रीला सहज आवडाल असे आहात तुम्ही! अगदी मुठीत राहणारे!

बच्चू —- (बावरलेल्या मुद्रेने) मुठीत?

अंजना—- का? घाबरला?

बच्चू—-– घाबरलो नाही ; नाही म्हणजे,अं : मुठीत कसा काय राहील हो हा देह?

अंजना—--- देह न का राहीना! पण तुमचं हृदय राहीलं म्हणजे झालं! माणसाच हृदय मुठीएवढं असतं! राहील तुमचं हृदय मुठीत!

बच्चू ——- हो, हो राहील की! हृदय मुठीएवढं असतं होय? तर मग मूठच राहीना माझी तुमच्या मुठीत!

अंजना—--. (एकदम खुश होऊन) वा! किती छान! कित्ती काव्यपूर्ण बोलता तुम्ही गडे! माझ्याशी तुम्ही नेहमी असंच बोललं पाहिजे.बोलाल ना असंच?

बच्चू—-- बोलेन, बोलेन की! त्यात काय आहे?

अंजना—- पण 'तुम्ही -तुम्ही' काय करताहात मला मगापासून?

a

बच्चू—— (लाजऱ्या शब्दात) अंऽऽओळखलं मी! आज अगदी पहिल्यांदाच तुमच्याशी बोलायचा चान्स मिळाला आहे! झटक्यालाच कसं एकेरीवर येईल?

अंजना——— न यायला काय झालं?

बच्चू —— पण अजून जरा भीति —जरा सराव झाला पाहिजे ग! (जीभ चावतो)

अंजना ——— वा! तुमच्या तोंडचा 'ग' किती गोड आहे!

मधु —— अंजने! सांभाळ स्वतःला! हा माझा
बुद्धिपुरस्सर तू अपमान करीत आहेस! माझी सहनशक्ति संपत आहे!

अंजना —-- अरे जा! ऐकवत आणि पहावत नसेल तर काळं कर इथून! तुला कुत्र्याला कुणी आमंत्रण दिलं आहे इथं?

मधू —-- Shut up! जीभ तोडून टाकीन,-खून करीन खून!!

बच्चू—— (घाबरून) खून! कुणाचा?(आवंढे गिळीत उभा राहतो.)

अंजना—--- तुम्ही कोण मला धमक्या देणार?मी काय तुमच्या लग्नाची बटीक आहे?बच्चमजी हाकला या ओसरीवर आलेल्या भटाला! हा इथं उभा आहे हे विसरलेच आहे मी!

बच्चू —---. (अस्तन्या वर करून) अरे ए, मानापमानाच्या कांद्या! आधी माझ्या खोलीच्या पायऱ्या उतर आणि रस्त्यावर जाऊन तुझ्या गोष्टी बोल! म्हणे अपमान होत आहे! माझा अपमान आजपर्यंत केलास अंजनाबाईच्या समोर (जीभ चावतो) – नव्हे, माझ्या अंजनेच्या समोर तेव्हा कुठे गहाण ठेवली होतीस विवेकबुद्धी? अं?चालता हो!

मधु—— का रे महाभागा? शुद्धि गेली की काय? या दंडाचं सामर्थ्य ठाऊक आहे ना तुला? कोंबडीची मान मुरगळल्यागत मुरगळून टाकीन!

बच्चू—--- (त्याच ताठ्यात) अरे जा, ठाऊक आहे!

मधु—- (आवेशाने) ठाऊक आहे? (धावत जातो)

बच्चू—-- (अवसान टाकून देऊन) अं - अं -तसं म्हणालो नाही मी! - (पुन्हा अवसान)हो हो तसंच म्हणालो मी! (मोहरा बदलून) हे बघ दोस्त, हिचा एक नाद सोड म्हणजे तुझी माझी दोस्ती जानी!

a

अंजना—- नाहीतर थांबा बच्चम! याला इथेच उभं राहू द्या!अपमानाचं विष किती जहरी असतं याचा याला इथं अनुभव घेऊ द्या!

बच्चू—-- (पुन्हा अवसानपूर्वक) हो, हो! तसंच होऊ दे! पी! अपमानाचं जहर पी,अगदी आकंठ पिऊन घे! नेहमी मधु पिऊन चटावला आहेस!

मधु—-- अरे घुबडा, तुझे घुत्कार आता बंद कर! (अंजनाकडे वळून) अंजना,अंजना! असं करू नकोस अंजना! भलता हट्ट धरू नकोस!

अंजना—- भलता हट्ट मी धरलेला नाही! तूच हट्टी आहेस! हट्टी माणसाने इतरांकडून हट्टाशिवाय दुसऱ्या कशाचीच अपेक्षा करू नये! मूर्तिमंत हट्ट आहेस तू!

बच्चू —-- (दुजोरा देत) हो मूर्तिमंत हट्ट आहेस तू!

अंजना—-- बस्स! असा जोडीदार हवा मला! मी तुम्हाला आजवर ओळखलं नाही!(रडकुंडीस येऊन) वाईट वाटतं हो फार! (डोळ्याला पदर लावते)

बच्चू —- (दुःखाने) अरे रे रे...... रडू नकोस हो! (रडव्या स्वरात) मलाही रडू येईल!

अंजना—-- आजपर्यंत मी निष्ठुरपणे आपली अमर्यादा केली! आपल्याला ओळखलं नाही. आपण क्षमा कराल का हो मला?

बच्चू—- क्षमा? हा काय प्रश्न झाला? तुम्ही माझा शंभर वेळा जरी खून केलात, तरी ते गुन्हे तुम्हाला मी माफ करीन!

अंजना—-- अहाहा! किती आनंद झाला मला हे ऐकून! याला म्हणतात प्रेम! उगाच नाही तांब्यांनी म्हटलं : 'काटा माझ्या पायी रुतला, गालांवर तव ढग ओघळला! '

बच्चू—--. (आसवं पुशीत) हा काय इथे ढग ओघळला आहे!

अंजना—-- नाही तर तू! दगडाचं काळीज आहे तुझं! मला रडू आलं तर निदान गप्पहि बसणार नाहीस तू! मिटक्या मारीत वर हसत बसशील!

मधू—-- रडवे पुरुष बायकांना कधीपासून आवडू लागले हे भावी इतिहासकारांना समजण्यासाठी या क्षणाची नोंद मला केली पाहिजे!

अंजना—-- अरे तुला काय ठाऊक आहे? बायकांना हवा असलेला आदर्श पुरुष उभा आहे इथं?

मधू—-- नुसतं बायकांना न म्हणता आधुनिक बायकांना असं म्हण!

अंजना—-- आजच्या आम्हा तरुणीना हृदय असलेला पति हवा असतो!

मधु—-- वा! हा तुला झालेला नवा साक्षात्कार वाटतं! पूर्वीच्या बायकांच्या वाट्याला हृदयहीन पुरुषांचीच खास निपज परमेश्वरानं केली होती वाटतं!

अंजना—-- तुझ्या अज्ञानाची मला कींव येते मधु! अरे तो शिवछत्रपतींचा काळ केव्हाच गेला! काळ सारखा धावतो आहे! इतिहास सारखा गतिमान आहे! तुझ्यासारखी राकट जनावरं शिवकालीन स्त्रीचा आदर्श होती असतील! आज आम्ही स्त्रियांनी कितीतरी प्रगती केली आहे! प्रगतीपथावर आम्ही सारख्या धावत आहोत!

मधु—-- मग नाजूक जनावर शोधायचं ते तरी सुंदर शोधायचं होतंस! शोधायचं शोधून असलं मर्कट!

बच्चू—-- हो! तोंड आवरून बोल! अंजनाबाई — चुकलो, अंजन, माझा अपमान होतोय हा! माफ करा — मला एकेरी संबोधण अजून हुकमी जमलेलं नाही!

मधु —-- आणि ते जन्मभर जमणार नाही!

अंजना—-- न जमू दे! काही अडत नाही त्यामुळं! निदान तुझा चोंबडेपणा नको मधेच!

बच्चम—-- अहो, असं का करीत नाही?तुम्ही मला अरे- तुरे करा! मी तुम्हाला आपला अहो-जाहो करीन! काय हरकत आहे?

मधु—-- वा! ठीक मग तर सारच जमलं! आधुनिक आदर्श पुरुषाचे दशावतार याच्यारूपाने इथं उभे राहतील! पुरुषांनी आजपर्यंत बायकांना अग-तुग केलंच आहे; ती गुलामी फार झाली नाही? आधुनिक स्त्रीचा आज अगदी उद्धार होईल, तिच्या गेल्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार होईल!

अंजना—--. हो खरंच आहे मुळी! आता स्त्रियांनी यापुढे कटाक्षाने पुरुषाला अरे तुरे आणि पुरुषाकडून अहो जाहो म्हणून घेण्याचा काळ आलाच पाहिजे! त्याशिवाय तुझ्यासारख्या उर्मट पुरुषी पुतळ्याचं नाक खाली होणार नाही!

a

मधु—-- नाक खाली करायला चांगला नाकेला तरी नवरा कर! खाली करायला हवं असणारं नाक चटकन् पकडता यायला नको का? नाहीतर असं पहा, स्त्रीच्या नाकाच्या शेंड्यावर जसा राग असतो तसाच तो लवकर शांतहि होतो. नवऱ्याचं नाक चटकन हाती येणार नसलं तर ते शोधून पकडेपर्यंत तुझा रागच शांत व्हायचा! बघ अजून विचार कर!

अंजना—-- ते माझं मी पाहून घेईन! तू उगीच तुझं नाक मधेच खूपच नकोस!

मधु—-- आजच तुला माझं नाक खुपू लागलं काय? काळ फिरला! दुसरं काय!

बच्चू—-- हे याचं काळकाढू राजकारण आहे. अंजनाबाई, नव्हे --अंजना! याच्याशी आता शब्दांचा खेळ आपण टाळावा हे चांगलं! (लाजत) मी तुमच्याशी अगदी तुमच्याशी अं— अं—- (अधिक लाजतो) म्हणजे अगदी तुमच्याशीच काही गोष्टी प्रायव्हेटली बोलण्याच्या संधीची वाट पाहतो आहे. या संधीची भीक तुम्ही आता माझ्या पदरी घालाल का?

मधु—-- अरे संधिसाधु! कशाला हाव धरतोस ती? गटारानं गंगेला मिळण्याचा प्रयत्न करण्यासारखा हा प्रयत्न आहे अंजन!

अंजना—--. जपून शब्द वापर मधु! मी सहन करणार नाही यांचा —-

बच्चू —--. (थांबवून) याचा म्हणा हो?

अंजना—-- हो, याचा अपमान!

बच्चू—-. बरोबर बोललात!

मधु—-- तू काय पाहिलस यांच्यात अंजना?
ही याची छाती म्हणजे एक भाता आहे, शेवग्याच्या शेंगाप्रमाणं याचे हे हात आहेत. याचे हे पाय म्हणजे लोंबणारी दोन पडवळं! काय याला बुद्धिमत्ता आहे की याला साधं व्यवहार ज्ञान आहे?

अंजना—- बस कर मधु! मी पुन्हा बजावते! कुणापुढे आणि कुणाविषयी बोलतोस याचं काही भान बाळगून बोल!

मधू—-- माझ्यावर सूड घ्यायचाच जर तुझा निश्चय होता तर तू या दुर्बळालाच कशाला निवडलंस? एखादा सामर्थ्यवान पहाडी पुरुष नसता का तुला गाठता आला?

a

अंजना—- पहाडी म्हणजेच जंगली पुरुष! तसले पुरुष आवडणाऱ्या स्त्रिया आता इतिहास जमा झाल्या मधु! तुझ्यासमोर २० व्या शतकातली स्त्री उभी आहे!

मधु—-- विसाव्या शतकातली स्त्री ही स्त्रीच आहे ना? छातीचा भाता झालेला पुरुष तिला आवडेल?

बच्चू—-- छातीचा भाता छातीचा भाता ही काय मगापासून भानगड काढली आहे यानं?

मधु —-- तुझ्या छातीकडे जरा पहा म्हणजे समजेल!

बच्चू —-- हात्! एवढेच! मग छातीचा भाता ही काही नवी चीज नाही! प्रत्येकाची छाती म्हणजे एक भाताच आहे! अहाहा! काय उपमा आहे! काय काव्य आहे! थांबा आता काव्य सुचण्याची वेळ येऊन ठेपली आहे! (गुणगुणतो)

"छाती म्हणजे भाऽऽता
जाणा हो!
प्रीती वसे तयाऽऽत
वारा हो!

a

अंजना—-- अहाहा! काव्य!

मधू—-- बस कर हे रसग्रहण! मला इथं आता मुळीच उभं राहावत नाही! हा तुझा अध:पात अधिक काळ पाहावत नाही!

बच्चू—--. मग चालता हो इथून! तुला काही इथं सहकुटुंब सहपरिवार मित्रमंडळीसह अगत्य येण्याचं आमंत्रण दिलं नव्हतं मी! (अंजनाकडे पाहून) अं, आम्ही! आणि पाहवत नसलं तर डोळे मिटून घे - अगदी कायमचेच मिटलेस तरी आमची हरकत नाही! (पुन्हा अंजनाकडे साभिप्राय पाहतो)

मधु—--. माझ्या मरणाची वाट पाहतो आहेस काय? प्रेताच्या अग्नीवर पोळी भाजून घेणाऱ्या संमंधा! लक्षात ठेव.मी तसा फुकाचा मरणार नाही. मरणापूर्वी तुझं नरडं निश्चित दाबून मरेन!

बच्चू_—-- अरे धावा,धावा!खून, खून!

अंजना—-- हे काय? मी आहे ना इथं!

बच्चू —--हो, पण हा इथे नको! याच्या जाण्याची काहीतरी तजवीज त्वरित करा! मला भीति वाटते! गळा दाबील माझा हा!

मधु —--अरेरे! नाही सहन होत हे! अंजने,माझा प्रतिस्पर्धी निदान कोणी बलवान, कुणी समर्थ शोधायचा होतास! पुन:पुन्हा असं मला म्हणावं लागत आहे! कुणी बलदंड असता तर त्याच्याशी दोन हात केले असते! या भुसा भरलेल्या पोतडीशी कसली टक्कर देऊ?

अंजना—--- हा युद्धनितीचा प्रश्न आहे मधु! तुझ्या विरोधाची गोळी माझ्यापर्यंत येऊच नये अशी ही तजवीज आहे! शत्रूसैन्याच्या गोळया अडवायला भुसा भरलेल्या गोण्यांचाच आसरा घ्यावयाचा असतो

मधु—--- शंभर टक्के पराभूत केलंस मला!अगदी अत्याधुनिक स्त्री आहेस! जातो मी आता!

अंजना —-- थांब! अजून तुझं हसं झालेलं मला पाहावयाच आहे! अजून माझं समाधान झालेले नाही. महाभूक लागली आहे मला!

मधु—--भस्मरोगच झाला असावा तुला! मलाच खाल्ल्याशिवाय तुझी भूक शांत होणार नाही! घे, माझ्या या देहाचे, आत्म्याचे, हृदयाचे आणि मनाचे तुकडे तुकडे करून एखाद्या लांवेप्रमाणं खा!

बच्चू —--नका!नका! जाऊ दे याला इथनं! ही पीडा माझ्या अत्यानंदाच्या क्षणी पाचवीला पुजलेल्या साडेसातीसारखी उपटली आहे! माझ्या आनंदचंद्राला ग्रासून राहिलेला हा राहू आहे! हा इथं आणखी थांबला तर खग्रास ग्रहण लावील! जाऊ दे याला. आपण आपली मौज करू या!

अंजना—--खरंच! इथं आल्यापासून हे शुक्लकाष्ट गांधिलमाशीप्रमाणं सारखं मागं लागलं आहे! नाही तरी मलाहि याचा तिटकाराच आला आहे! पण मेला गोमाशीसारखा अजून चिकटून राहिला आहे! जा.चालता हो तू इथून!

मधु —---आता जातोच! तुझ्या प्रेमाचे हे दशावतार - त्यातला हा वराह अवतार - पाहण्याची मलाहि अगदी शिसारी आली आहे! या दुबळ्या आषुकमाषुकाच्या पुळचट चोथ्याचं सुखनैव रवंथ करीत एखाद्या म्हशीसारखी डुंबत रहा या डबक्यात! (दरवाजा गाठतो)

(तेवढ्यात बिंदू प्रवेश करते)

बिंदू—--(जात असलेल्या मधुला अडवून) थांबा मधुकरराव! जाण्याचं काहीच कारण नाही! मी आणली आहे संजीवनी मजबरोबर! (मधू थांबतो)

बच्चू —--(आश्चर्याने) आं? अजून तू मेली नाहीस?

बिंदू —--शक्य झाल्यास तुम्हाला पुरून उरणार आहे

मधु —--आणि मला संजीवनी देतो म्हणालात त्याचं काय?

बिंदू—--(फलक April Fool दाखवीत) ही काय संजीवनी!

मधु —-- April fool? पण कोण?

बिंदू —--आणखी दुसरं कोण असणार? तुमच्यासमोर उभे आहेत की ते! घ्या हा फलक आणि (बच्चूकडे हात दर्शवून) दाखवा यांना!

मधु—--(हातात फलक धरून) बरोबर! महामुर्खा, नीट डोळे फोडून वाच!

बच्चू—-(बेफिकीरपणे) तुमच्या दोघांच्या या माकडचेष्टांकडे अंजना माझ्या शेजारी उभी असताना मला लक्ष देण्याचं मुळीच कारण नाही!

बिंदू —--अगं अंजन, एक स्त्री, तुझी मैत्रिण म्हणून मी तुला आवाहन करते! एक स्त्री तुझ्यासमोर - एका स्त्रीसमोर पदर पसरत आहे! स्त्रीला स्त्री वश होते असं हेच मला सकाळी म्हणाले आहेत. मला हे हवे

a

आहेत! हे माझे आहेत. यांच्यावर मी जिवापलिकडे प्रेम करीत आले आहे! माझी भिक्षा माझ्या पदरात पडेल का?

बच्चू—-- अरे हड् हड्!.........पुढच्या दारी जा! इथं हात खाली नाही!चालती हो!

अंजना —--थांबा! दारी आलेल्या याचकाला रिक्तहस्त पाठविणं हे कुणालाहि शोभत नाही!

बच्चू—-मग काय करणार आहात तुम्ही?

अंजना —--(फलक हाती घेऊन) दुसरं काय करणार? हे तुम्हाला दाखविणं आता भागच आहे!

बच्चु—-- अरेरे. काय पाहतोय मी हे? मी जागा आहे की स्वप्न पाहातो आहे हे? (चिमटा काढून पाहतो डोळे चोळून पाहतो) अरेरे. हे सार खरं आहे तर! माझं हृदय फुटू पाहत आहे हो! धरा, कुणी तरी धरा मला!

बिंदू —--कुणी कशाला हवं? मी आहे ना इथं! सांगा ना मला! नाही तर माझा उपयोग काय? (बिंदू बच्चूला सावरून धरते)

बच्चू —--(अंजनेस) काय तुम्ही मला नाही सावरून धरीत? शोभतं तुम्हाला हे?

अंजना—-- माझ्या शोभण्याचा प्रश्न आता बाजूस ठेवा! तुम्हाला ही शोभते हे काय कमी झालं?

बच्चू —--छे! असं कसं होईल? हे मी होऊ देणार नाही!

बिंदू —-- न व्हायला काय झालं?आता ती गोष्ट तुमच्या हातची राहिलेली नाही!

बच्चू —-- माझ्या हातचीच आहे!

बिंदू —--- इथं पहा आणि मग बोला. हा "चिंतामणि- ताईत" हे "वशिकरण यंत्र " मीहि आज गेले १०० दिवस यांच्या उपासनेत आहे.आज माझ्या तपश्चर्येचा १०१ दिवस!

बच्चू—-- आं? तुहि याच साधनेत
होतीस?

बिंदू —-- मीहि मनुष्यप्राणीच आहे!

बच्चू —-- मग आता तुला मी वश झालंच पाहिजे! गत्यंतरच नाही मला! तुझ्याशी लग्न करण्यावाचून दुसरा मार्गच नाही आता?

मधु—-- बरोबर! चिंतामणिताईत आणि वशिकरण यंत्राचा प्रभावच आहे तसा! शिवाय बर्नाड शॉचहि मत: Marry when you must! -असंच आहे!

बच्चू —-- काय म्हणालास मधु? शो लागला आहे म्हणालास?

अंजन —-- हो. Marry when you must! -हा सिनेमा

बच्चू —-- कोणत्या थिएटरात?

बिंदू—-- इथं! या थिएटरात! हा काय चाललाय इथं खेळ! या खेळावर जर तुमचा विश्वास बसत नसेल तर त्यावर आहे एक मजकडे तोडगा.(हातातील पिशवीतून कुडबुडे व कुडबुड्या ज्योतिषीचा वेश देते) घ्या हो मधुकरराव! हे घ्या कुडबुड. हा घ्या पोषाख. बना आता पुन्हा ज्योतिषि!

मधु —-- आता तो झगा,ते मुंडास आणि त्या मिशा चिकटवायला येळ न्हाई माय! धनीशाबास्नी निस्त कुडबुड वाजवूनशेनी भविष्य सांगतो हुवं

तर! या धनीसाब,असे संबुर या! पिंगळा कधी ख्वाटं बोलणार नाही! माझ्या सांगन्यापरमानं आज ही लक्ष्मी (बिंदू) आपल्या घरात या दारानं आपल्या पायानं चालत आली न्हवं? आता माझी बक्षिसी द्या! होव तर आनखी भविष्य सांगतो!

(कुडबुडे वाजवतो.)

बच्चू —-- अरे चोरा! तू होतास काय तो?

मधु —--. हां! अशा बोलण्यानं माझी बक्षिसी न्हाई चुकायची मालक! आता माझं हे कुडबुड सोन्यानं मढवून द्या!

बच्चू —-- अरे भविष्यवाल्या!! आतां भविष्यापेक्षा भूतकाळात काय घडलं ते सांग म्हणजे पुरे! हा सगळा डाव तुझाच ना!

मधु —--(अंजनाकडे साभिप्राय पाहून) हा डाव नव्हे! हे डोळे उघडण्यासाठी अंजन होतं! आणि हे झणझणीत अंजन कुणी घातलं हे आता सांगितलंच पाहिजे का? आता कशाला ती तसदी देता राव! आता निस्त कुडबुडं वाजवतो म्हंजी झालं! (कुडबुडे) बरं येतो आम्ही! राम राम!! (अंजना व मधु जातात). बिंदू व बच्चू एकमेकांकडे पाहत उभे. (पडद्यामागे कुडबुडे).

---

a

**तारीख १५/८/१९५६**

**समाप्त ; खेड रत्नागिरी**

==================================

या नाटकाचे प्रयोग करू इच्छीणाऱ्यांनी कृपया संपर्क करावा
कुमुद्वती भोसले
पत्ता - प्लॉट नंबर 15, दीप सेवक सोसायटी, आर के नगर, कोल्हापूर. महाराष्ट्र.
संपर्क – व्हॉट्स ऍप क्र. ९९७०१०३३७८
Email : bhosalekumudwati@gmail.com

==================================

ई साहित्यवर अशीच अनेक नाटके वाचा

**नाटक (esahity.com)**

**फक्त एक क्लिक करा.**

a

**कै. पांडुरंग दे. सूर्यवंशी यांची ई साहित्यवरील या आधी प्रकाशित पुस्तकं(नाटकं)**

**फक्त एक क्लिक करताच उघडेल**

